# पोलीस स्थानकांची दशा

**२१ जुलै २०१०**

प्रज्ञा शिदोरे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

कायदा आणि सुव्यवस्था या नीलप्रतीसाठी)

# पोलीसस्थानकांची दशा

दहशतवादी संघटनांनी मुंबईपाठोपाठ आता पुणे शहराला लक्ष्य केले आहे. त्याला आळा घालण्यासाठी शहराबरोबरच उपनगरातही पोलीस यंत्रणा सज्ज असायला हवी. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता पोलीस स्थानके अधिक कार्यक्षम करायला हवीत. परंतु आज पुण्यात हलगर्जीपणामुळे वा निव्वळ लाल फीती कारभाराने नागरी सुरक्षा धोक्यात आणली आहे. आज शासन पोलीस कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे तर सोडाच पण पोलीस स्थानकाची एक निश्चित जागा देखील देऊ शकत नाही.

**येरवडा:**

व्यावसायिक हितासाठी येरवडा पोलीस ठाणे नुकतेच एका बांधकाम व्यावसायिकाला विकण्यात आले [1]. अधूनिक शस्त्रास्त्रांची मागणी पोलिसांकडून वाढत असतानाच येरवडा पोलीसांना या विचित्र प्रस्तावाला सामोरे जावे लागले. शस्त्रास्त्रांच्या मागणीची पूर्तता सोडाच, पण या सौद्यासाठी बराच राजकीय दबाव टाकण्यात आला.

पुण्याचे पोलीस कमिशनर सत्यपाल सिंग, माजी पोलिस महासंचालक जयंत उमराणीकर, सध्याचे पोलीस महासंचालक अनामी रॉय बरोबरच अन्य पोलिस अधिकाऱ्यांनी या प्रकाराला तीव्र विरोध दर्शविला. परंतु अतिरिक्त मुख्य सचिव चित्कला झुत्शींच्या दबावाखाली हा निर्णय घ्यावा लागला. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांचे त्या बिल्डरला पाठबळ लाभले आहे असे समजते.

**कोरेगाव पार्क**

कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनला राज्य सरकारची मंजुरी मिळून देखील जागे अभावी हे ठाणे अस्तित्वात येऊ शकत नाही[2]. "छबाड हाउस', ओशो आश्रम, जर्मन बेकरी व अनेक लष्करी संस्था अशी संवेदनशील ठिकाणे असलेल्या हे ठाणे आहे. तसेच परकीय नागरिकांचाही वावर असतो. त्यामुळे तातडीने पोलिस ठाणे सुरू होण्याची आवश्यकता आहे. जर्मन बेकरी मध्ये स्फोट झाल्यावर अचानक ह्या पोलीसचौकी बद्दल पाउले उचलली गेली. कोरेगाव पार्कमधील खासगी मालकीच्या जमिनीवर स्वतंत्र पोलीस ठाण्याचा प्रस्ताव पुढे करण्यात आला[3]. साडेबारा हजार चौरस फूट आकाराची ही खासगी जागा मिळावी या संदर्भात गृहमंत्रालय, महसूल खाते व अन्य खात्यांमध्ये पत्रे पाठवण्यात आली आहेत.

---

**1** Blast at a time when police low on morale, S Balakrishnan, TNN, 14 February 2010,

[2] कोरेगाव पार्क पोलिस ठाणे कधी?, सकाळ १६ फेब्रुवारी २०१०

[3] २१ फेब्रुवारी, लोकसत्ता

**लोणावळा**

लोणावळा नगरपालिकेने पोलीस स्थानक शहराच्या बाहेर हुसकवण्याचा डाव साधला आहे. पोलीस स्थानकाच्या जागेत आता पार्किंगला जागा देण्यात येण्यार आहे[4]. शहर पोलीस स्टेशन गावाबाहेर गेल्यास येथील ६५ हजार लोकसंख्येसह पर्यटनस्थळांना भेटी देण्याकरिता येणाऱ्या लाखो पर्यटकांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होणार आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता पोलीस स्टेशन गावातच असणे अत्यंत गरजेचे आहे .याकरिता पूर्वठरावानुसार पोलीस स्टेशनचे आरक्षण पुन्हा कायम करावे, असे आवाहन लोणावळा शहर पोलीस स्टेशन करत आहेत.

**मुंढवा**

वाढते दहशतवादी हल्ले, वाढती लोकसंख्या यामुळेच शहराबरोबरच उपनगरातही पोलीस यंत्रणा सज्ज असायला हवी, या हेतूने पूर्व भागात हडपसरपाठोपाठ मुंढवा पोलीस स्टेशनची गरज लक्षात घेऊन शासनाने सुमारे २४ लाखाचा निधी दोन वर्षांपूर्वीच (८ ऑक्टोबर २००८) मंजूर केला होता. पोलीस स्टेशनच्या उभारणीसाठी जागा मिळावी यासाठी पोलीस आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना ६ फेब्रुवारी २००९ रोजी लेखी मागणी केली. २६ मे २००९ रोजी महापालिकेच्या भूसंपादन व व्यवस्थापन उपायुक्तांची मुंढवा पोलीस स्टेशनसाठी कुटीर रुग्णालयालगतची ५ हजार चौरसफूट जागा ५४३७ रूपये दरमहा या दराने काही अटींवर देण्यास संमती दिली. परंतु जागा किमान २० गुंठे असावी, अशी मागणी असल्याने निधी परत जाण्याची शक्यता आहे [5].

पोलीसांच्या कामकाजात १०० अडथळे परंतु बिल्डरांना मात्र रान मोकळे सोडण्याचा घाट महानगरपालिकेनी घातला आहे. पालिकेच्या स्थायी समितीने 'आधी विनापरवाना बांधकाम करा आणि नंतर रीतसर परवानगी घ्या' असा अजब निर्णय २ फेब्रुवारी रोजी घेतला. पालिकेकडून परवानगी मिळणारच अशी खात्री असल्याने काही बडे बिल्डर्स परवानगी न घेता बांधकामे करतात. दंड भरल्यानंतर त्यांची बांधकामे नियमित होतात. ही सोय काही विशिष्ट लोकांना देण्यात येते. सामान्य लोकांनाही हा लाभ मिळावा, या हेतुने असा निर्णय घेतला गेला असे समजते [6].

---

[4] लोणावळा पोलीस स्थानक शहराबाहेर हलविण्याचा घाट (लोकसत्ता, १४ फेब्रुवारी)

[5] मुंढवा पोलीस स्टेशनसाठी मंजूर निधी जागेअभावी पडून? १८ फेब्रुवारी, लोकसत्ता.

[6] आधी बांधकाम करा, मग परवानगी, म.टा, ३ फेब्रुवारी २०१०